


कृपया प्रसिद्धीसाठी                                        दि. ३ फेब्रुवारी २०१९

लोकप्रतिनिधींनी लोकसंख्या वाढीवर बोलावे
खासदार सुप्रिया सुळे यांचे प्रतिपादन, एमआयटी-डब्ल्यूपीयू तर्फे'भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळा

पुणे, दि. ३ फेब्रुवारी : "देशातील सर्व समास्यांच्या मुळाशी लोकसंख्या वाढ हे महत्वाचे कारण आहे. भविष्यात लोकसंख्या नियंत्रण करण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा व समाजामध्ये लोकजागृती केल्यास समस्यांचे निराकरण करता येतील. मी पुन्हा निवडून आले, तर लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम राबवेल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केले.
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे, भारत अस्मिता फौंडेशन व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळ्यातील' भारत अस्मिता जनप्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्कार' स्वीकारल्यानंतर त्या बोलत होत्या.
केरळच्या कोझीकोड येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे संचालक प्रा. डॉ. देबाशिश चटर्जी यांना 'भारत अस्मिता आचार्य श्रेष्ठ पुरस्कार', अभिनेते स्वानंद किरकिरे,'भारत अस्मिता जन-जागरण श्रेष्ठ पुरस्कार' डब्ल्यूएचओचे सल्लागार डॉ. चंद्रकांत पांडव, 'भारत अस्मिता जन-जागरण श्रेष्ठ पुरस्कारा', सीएसआयआरचे महासंचालक डॉ.शेखर सी.मांडे 'भारत अस्मिता विज्ञान-तंत्रज्ञान श्रेष्ठ पुरस्कार' आणि सॉफ्टवेयर इंडस्ट्रीजचे जनक डॉ. एफ. सी कोहली यांना 'भारत अस्मिता विशेष जीवन गौरव पुरस्कार' यांना गौरविण्यात आले. जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, ज्येष्ठ संगणक तज्ञ व नालंदा विद्यापीठाचे कुलपती पद्मभूषण डॉ. विजय भटकर, आणि एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या हस्ते भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह व प्रत्येकी सव्वा लक्ष रुपये असे पुरस्काराचे स्वरुप होते.
याप्रसंगी श्री. तुळशीराम दा. कराड, बिहारचे पर्यटन मंत्री प्रमोद कुमार, एमआयटीचे अधिष्ठाता प्रा. शरदचंद्र दराडे पाटील, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल विश्वनाथ कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश तु. कराड, माईर्स एमआयटीच्या कार्यकारी संचालिका डॉ. सुचित्रा कराड - नागरे, एमआयटीडब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. एस. परशुरामन, प्रो होस्ट डॉ. श्रीहरी होनवाड, डॉ. आर. एम. चिटणीस, कुलसचिव प्रा.डी.पी.आपटे आदि मान्यवर उपस्थित होते.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, " वारसा हा रक्तांनी मिळत नसतो, तो मेहनतीने आणि स्वकष्टाने मिळवता आला पाहिजे. देशात शहरी व ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे तरुणांमध्ये नाराजी आहे. बेरोजगारी वाढण्यासाठी लोकसंख्या वाढ हे महत्वाचे कारण आहे. भविष्यात सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी लोकसंख्या वाढीचा मुद्दा घेऊन लोकजागरण केले पाहिजे. सत्तेत नसताना केवळ टीका करता येते, मात्र सत्तेत असताना जबाबदारी स्वीकारून कार्य करावे. प्रत्येकांच्या आयुष्यात यश आणि अपयश येत असते. अपयश आल्याने खचून न जाता त्याचा सामना करत हिंमतीने पुढे आले, तर यश निश्चित मिळते. हा मंत्र प्रत्येकांने लक्षात ठेवावे. शिक्षण हे मानवी जीवनाला आकार देऊ शकते, त्यामुळे क्षमतापूर्ण शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली असावीत."

डॉ. एफ. सी. कोहली म्हणाले," देशात आज ही १० टक्के निरक्षर नागरीक आहेत. ही देशासाठी भूषवाह बाब नाही. कृषी हा सायन्साचा विषय असून या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संशोधन होत नाहीत. पाण्याचे स्त्रोत अटले असून जमिनीचा पोत खराब झाला आहे. यातच शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे बियाणे मिळत नसल्यामुळे उत्पादका घटत आहे. परिणामी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे. देशात २० टक्केच नागरिकांना इंग्रजीची ओळख आहे. त्यामुळे संगणकाची भाषा ८० टक्के नागरिकांना कळत नाही. भविष्यात भारतीय भाषेतील हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर तयार केले जावेत."

डॉ. देबाशिश चटर्जी म्हणाले, "जागतिक स्तरावर भारतीय विचार पोहचविण्याचे कार्य स्वामी विवेकानंदानी केले. या देशातील संत-महंतांनी मानवता कल्याणाचे आणि शांतीचे विचार दिले. सत्यम, नित्यम आणि पूर्णम हे जीवनाचे महत्वपूर्ण अंग आहेत. या सूत्रांचा वापर आपल्या आयुष्यात करावे.
".
डॉ. चंद्रकांत पांडव म्हणाले," माझ्या वडीलांनी मला समस्यांच्या निराकरणाचे प्रशिक्षण दिले. भविष्याला आकार देताना गुरू, संधी आणि मार्गदर्शन महत्वाचे आहेत. निरोगी समाज घडविण्यासाठी सर्वांनी आपापले कार्य मेहनतीने करावे. सर्वांच्या जीवनात आरोग्य महत्वाचे आहे".

डॉ. शेखर मांडे म्हणाले," विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे लोकशाही मजबूत करण्याचे काम झाले. निवडणुकांमध्ये पारदर्शकता तंत्रज्ञानाच्या संशोधनामुळे झाली. विज्ञानासोबत कृषीच्या क्षेत्रात संशोधन केले जात आहेत. भविष्यात कृषीला ही महत्वाचे दिवस येतील".

स्वानंद किरकिरे म्हणाले, सध्याच्या काळात शिक्षण संस्थांमध्ये राजकारणावर बोलले जात नाहीत, मात्र एमआयटी शिक्षण संस्थेत राजकारणाचे धडे दिले जात आहे. भविष्यात हे भारतीय राजकारणासाठी महत्वाचे असणार आहे.
डॉ. रघुनाथ माशेलकर म्हणाले, शिक्षणात भविष्याला आकार देण्याची क्षमता असल्यामुळे भारत मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येईल. देशात परिवर्तन आणाय्चे असल्याचे संशोधनाला आणि संशोधनात्मक विचाराला महत्व द्यावे लागेल.

डॉ. विजय भटकर म्हणाले, भा म्हणजे प्रकाश आणि रत म्हणजे त्यात रममाण झाले. त्यामुळे भारत हा ज्ञानाचा प्रकाश देणार देश म्हणून पुढे येईल. यामुळेच चीनपेक्षा भारत हा सर्वच्च स्तरावर येईल.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"नव्या पिढीला दिशा देण्याचे कार्य भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून होत आहे. विज्ञान आणि अध्यत्माच्या समन्वयातून निर्माण होणाऱ्या पिढीच्या माध्यमातून भारत देश विश्व गुरू बनण्यास वेळ लागणार नाही. २१व्या शतकात भारत हा जगाच्या ज्ञानाचे दालन म्हणून उदयास येईल आणि या जगाला शांतीचा मार्ग दाखवील. भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कारांच्या द्वारे भारतीय तरुणांमध्ये भारतीय अस्मिता जागविण्याचा आमचा अल्पसा प्रयत्न आहे."

दरम्यान, एमआयटी एडीटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश. तु. कराड यांनी स्वागतपर भाषण केले. प्रा. राहुल विश्वनाथ कराड यांनी भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कारामागची भूमिका स्पष्ट केली. प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. पी. आपटे यांनी आभार मानले.
---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

विज्ञप्ति जारी करने हेतू 3 फरवरी 2019

बढती जनसंख्या देश की सबसे बडी समस्या
- एमआइटी डब्ल्यूपीयू के भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार प्रदान समरोह में सुप्रिया सुले ने कहा
- प्रा. डॉ. चॅटर्जी, स्वानंद किरकिरे, डॉ. पांडव, डॉ. मांडे और डॉ. कोहली हुए सन्मानीत

पुणे, 3 फरवरी : बढती जनसंख्या को नियंत्रित करने पर देश की कई समस्या अपने आप ही खत्म होगी. जिसके लिए जनप्रतिनिधियों को अपनी आवाज को बुलंद करना होगा. साथ ही जब हम फिर से सत्ता पर आएंगे तब इस समस्या को कैसे काबू कर सकते है इस पर कार्य करेंगे. ऐसे विचार सांसद सुप्रिया सुले ने रखे.
एमआइटी वर्ल्ड पीस युनिवर्सिटी, भारत अस्मिता फाउंडेशन और एमआइटी स्कूल ऑफ गवर्नमेंट की ओर से इस वर्ष सांसद सुप्रिया सुले, को भारत अस्मिता जनप्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्कार से सन्मानीत किया गया इस समय उन्होंने कहा कि वर्तमान समय शहरीकरण और बेरोजगारी बढती जा रही है. इस समस्या को सुलझाना जरूरी है. जीवन में जब असफलता आती है तो समझना चाहिए आगे सफलता आपका इंतजार कर रहा हैै. नितिमूल्य और कडे परिश्रम के चलते जीवन में किसी भी क्षेत्र में यश मिलता है. सत्ता में रहना बढा ही कठिण होता है, क्योंकि उस समय खंदों पर बढी जिम्मेदारी होती है.
यहां पर केरल के कोजीकोड स्थित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मैनेजमेंट के संचालक प्रा. डॉ. देबाशिश चटर्जी को भारत अस्मिता आचार्य श्रेष्ठ पुरस्कार, गीतकार एवं लेखक स्वानंद किरकिरे को भारत अस्मिता जन-जागरण श्रेष्ठ पुरस्कार, डब्ल्यूएचओ के सलाहकार डॉ. चंद्रकांत पांडव को भारत अस्मिता जन-जागरण श्रेष्ठ पुरस्कार, सीएसआइआर के महासंचालक डॉ. शेखर सी. मांडे को भारत अस्मिता विज्ञान-तंत्रज्ञान श्रेष्ठ पुरस्कार एवं पद्मभूषण डॉ. एफ.सी कोहली को भारत अस्मिता विशेष जीवन गौरव पुरस्कार से नवाजा गया. पुरस्कारक रूप में उन्हें स्मृतिचिन्ह तथा सन्मानपत्र प्रदान किए. पुरस्कार का यह 15 वां वर्ष था.
यह पुरस्कार वैज्ञानिक पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, नालंदा विश्वविद्यालय के कुलपति डॉ. विजय भटकर तथा एमआइटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी के संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड के हाथों प्रदान किए गए.
डॉ. कोहली ने कहा, देश में सौ मिलियन से ज्यादा अशिक्षीतों की संख्या है. जो जनसंख्या का 10 प्रतिशत हिस्सा है, यह लोग लिखने और पढने में अमर्थ है. इस समस्या को ध्यान में रखते हुए कार्य करना होगा. जिसके लिए अखबारों को पढने का नया मिशन शुरू हुआ है. वर्तमान दौर में कृषि क्षेत्र में बडे पैमाने पर रोजगार उपलब्ध करना जरूरी है. जल और मिट्टी के गिरते स्तर पर रिसर्च होना जरूरी है. हमें विज्ञान के बदौलत ऐसे बिजों का निर्माण करना होगा. जिससे कृषि क्षेत्र में क्रांती आए. साथ ही आइटी क्षेत्र के इस्तेमाल को बढना होगा. क्यों कि देश में केवल 20 प्रतिशत ही लोग अंग्रेजी को जानते है. तो ऐसे समय देश की भाषा में सॉफ्टवेयर और हार्डवेयर निर्माण करना सबसे ज्यादा जरूरत है. जिसमें बडे पैमाने पर रोजगार की संभावना छुपी है.
डॉ. चंद्रकांत पांडव ने कहा, जीवन में सहीं गुरू, सहीं अवसर और मार्गदर्शक मिलने पर सफलता के लिए किसी भी तरह की दिक्कत नहीं आती है. हर एक व्यक्ती का समजा के प्रति दायित्व होना चाहिए. स्वास्थ्य यह सभी जीवन का एक महत्वपूर्ण पल होता है. उसकी संभाल करने के लिए स्वास्थ्य वर्धक बातों का अपने शरीर में स्वीकार करना चाहिए.

शेखर सी. मांडे ने कहा, समाज उन्नती के लिए विज्ञान की जरूरत है. सीएसआइआर ने लोकतंत्र में वोट को देने जैसी महत्वपूर्ण भूमिका निभा रही है. भविष्य में कृषि क्षेत्र में सीएसआइआर की अहम भूमिका रहेगी जिसमें आर्टीफिशल इंटेलिजेंट का इस्तेमाल होगा. देश को आगे ले जाने के लिए वैज्ञानिक एवं तकनीक महत्वपूर्ण है.
देवाशिष चॅटर्जी ने कहा, भारतीय विचारों को वैश्विक करना है. तीन भारतीय नितिमूल्यों को हर पल ध्यान में रखना है. यह सूत्र सत्यम, नित्यम व पूर्णम है. हर पल अपने काम के प्रति सत्य रहना है. उसमें नित्यिम रहना है और आखरी पूर्णम जो अपने कार्य के लिए संपूर्ण होना है. इससे ही जीवन में सफलता मिलेगी.
स्वानंद किरकिरे ने कहा, इस इन्स्टिट्यूट में सारे विषयों पर बातचीत होना यह एक अनोखा संगम है. यहा के इन्स्टिट्यूट में सदैव ज्ञान रूपी चिडिया आती रहे.
डॉ. माशेलकर ने कहा, शिक्षा क्षेत्र में भविष्य होने से भारत निर्माण में इसकी अहम भूमिका होगी. वर्तमान समय डिजिटल इंडिया बना है. देश में परिवर्तन लाना है तो आइडिया पर काम करना सबसे महत्वपूर्ण है.
डॉ. विजय भटकर ने कहा, भारत अस्मिता अवार्ड के महत्व समझना जरूरी है. क्योंकि भा यानी ज्ञान का प्रकाश और इस रथ में भारत सवार हुआ है. इसलिए जल्द ही भारत चायना के आगे निकलेगा. हम सारी दुनिया के प्रबंधन को सिखते है. लेकिन भारतीय प्रबंधन क्या है इस पर नजर रखना जरूरी है.
डॉ. विश्वनाथ दा. कराड ने कहा, स्वामी विवेकानंद ने कहा था कि 21वीं सदीं में भारत विश्वगुरू बनकर उभरेगा. और यही देश सारी दुनियां को सुख, समाधान और शांति की राह दिखायेगा. पश्चात एमआइटी एडीटी युनिवर्सिटी के कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश तु. कराड ने अपने विचार रखे.
एमआइटी वर्ल्ड पीस युनिवर्सिटी के कार्याध्यक्ष तथा भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार समिति के निमंत्रक प्रा. राहुल विश्वनाथ कराड ने प्रस्तावना एवं स्वागत पर भाषण किया.
इस मौके पर बिहार के पर्यटन मंत्री प्रमोद कुमार, एमआइटी के अधिष्ठाता प्रा. शरदचंद्र दराडे पाटिल, तुलशीराम दा.कराड, एमआइटी वर्ल्ड पीस युनिवर्सिटी के कार्याध्यक्ष तथा भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार समिति के निमंत्रक प्रा. राहुल विश्वनाथ कराड, डॉ. सुचित्रा कराड नागरे, एमआइटी डब्ल्यूपीयू के कुलपति डॉ. एस. परशूरामन, कुलसचिव प्रा.डी.पी. आपटे, प्रो होस्ट डॉ. श्रीधर होनवाड, प्रो होस्ट डॉ. आर.एम.चिटणीस आदि उपस्थित थे.
कार्यक्रम का सूत्रसंचालन प्रा. गौतम बापट और प्रा. डी.पी. आपटे ने सभी का आभार माना.
------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**Press Release**

3/2/2019

**INDIAN LANGUAGES SHOULD BE USED FOR SOFTWARE : Dr. F.C.Kohali**

**Pune, 3rd Feb:** “Indian youth are quite intelligent. But the English language is the main barrier for them who are from the rural area. Even if a common man can do a lot if the Indian languages are used as a tool for software development”, **said Dr. F.C. Kohali,** Padma Bhushan, Chairman, Board of Governor's, College of Engineering, Pune (COEP).He was speaking after receiving the Special Life-time Achievement Award by Bharat Asmita National Awards Foundation for his contribution to the field of Information Technology. Other awardees felicitated at the Bharat Asmita National Awards along with Dr. F.C.Kohali were **Dr. Debashis Chatterjee** Director, Indian Institute of Management, Kozhikode, Kerala in the category of Acharya Shrestha Award, **Smt. Supriya Sule, MP** Rajya Sabha in the category of Jana Pratinidhi Shrestha, **Shri. Swanand Kirkire** , Noted lyricist, Singer, Writer,

Actor & Director, Indian Films & Television & **Dr. Chandrakant S. Pandav,** President, International Council for the Control of Iodine Deficiency Disorders (ICCIDD), India, in the category of Jana Jagran Shreshta, **Dr. Shekhar C. Mande**, Director General, Council of Scientific and Industrial Research (CSIR) in the **'Bharat Asmita Tantra-Vidnyan Shrestha Award'.**

The Award Ceremony was held on 3rd February 2019 jointly organised by MIT World Peace University, MIT School of Government and Bharat Asmita Foundation.

Also present at the ceremony were Dr. Raghunath Mashelkar, Dr. Vijay Bhatkar, Well Known Computer Scientist, Shri. Tulshiram Dadarao Karad, Dr. Vishwanth Dadarao Karad, Rahul Karad, Executive President, MIT World Peace University, Prof.Dr.Mangesh T. Karad, Dr. Suchitra Karad-Nagare, Prof.Sharad Chandra Darade- Patil, Dr. Shrihari Honwad, Prof. D.P.Apte & Dr. R .M. Chitnis.

Dr.F.C.Kohali said, "we started working on information technology when nobody in the country was aware of it. JRD Tata supported me but the then government was not that much curious about it. We still continued with it & today it is an integral part of every organization. The youth are working on software development whose companies are connected with mainly USA. There has become a limitation to them because of the language. We also should insist on hardware development which will make the country self sufficient. "

**Smt. Supriya Sule** said, "We are going to take the population control on the top priority. Then only the whole country will be nurtured with proper food. It is very simple to be in the opposition because we have to criticize the government. But it is your real test of efficiency when you are in the power and you have to show the results."

**Shri. Swanand Kirkire** said, "I have seen many institutes who proudly say that they have nothing to do with the politics. But I appreciate that this institute is organizing the Students Parliament every year." He expressed his thoughts and feelings regarding the abortion of girl embryo in a very poetic manner sung by himself."

**Dr. Chandrakant Pandav,** said, "My father insisted on me to solve the cent percent problems during the examination of mathematics. Not only that he told me that this should be done within less time. I developed this habit which helped me throughout my life."

**Dr. Shekhar Mande,** said, "While working in Council of Scientific and Industrial Research (CSIR) we are trying our best to make the application of science to all the fields like agriculture also. In this way we can contribute to increase the ease and transparency in the voting process."

**Dr. Debashis Chatterjee** said, "The ancient Indian culture can show the pathway to the whole world to get the happiness. Truth, Consistence & Perfection are the three stages for development of anybody in the world."

Dr. Raghunath Mashelkar said, "The education can contribute to the all round development of the society. We should try to Innovative thinking in this process."

Dr. Vijay Bhatkar said, "India was having high standard universities like Takshashila & Nalanda. We are sure that the students from western countries will come to India to learn here."

Dr. Vishwanath D. Karad said, “Union of science & spirituality will lead to peace in life. India will become the knowledge corridor of the world in 21st century.”

Prof.Dr.Mangesh Karad expressed his thoughts regarding the duty of educational institutes.

Rahul Karad explained the background of the awards in his introductory speech. Prof. Gautam Bapat compeered the function and Prof.D.P.Apte gave away the vote of thanks.

फोटो ओळी
फोटो क्र.३५११-
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे◌े व भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता जनप्रतिनिधी श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान प्रसंगी डावीकडून डॉ. सुचित्रा कराड-नागरे, प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, खासदार सुप्रिया सुळे, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. राहुल कराड.

फोटो क्र.3463-
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे◌े व भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता आचार्य श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान प्रसंगी डावीकडून डॉ. सुचित्रा कराड-नागरे, प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. देबशीश चटर्जी, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. राहुल कराड.

फोटो क्र.३६६०-
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे◌े व भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता विज्ञान तंत्रज्ञान श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान प्रसंगी डावीकडून डॉ. सुचित्रा कराड-नागरे, प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ शेखर मांडे, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. राहुल कराड.

फोटो क्र.३६३७-
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे◌े व भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता जनजागरण श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान प्रसंगी डावीकडून डॉ. सुचित्रा कराड-नागरे, प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. चंद्रकांत पांडव, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. राहुल कराड.

फोटो क्र.३५७७-
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे◌े व भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता विशेष जीवनगौरव पुरस्कार' प्रदान प्रसंगी डावीकडून डॉ. सुचित्रा कराड-नागरे, प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. एफ. सी. कोहली, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. राहुल कराड.

फोटो क्र.३६०८-
एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे◌े व भारत अस्मिता फाऊंडेशन, पुणेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'भारत अस्मिता जनजागरण श्रेष्ठ पुरस्कार' प्रदान प्रसंगी डावीकडून डॉ. सुचित्रा कराड-नागरे, प्रा.डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. विजय भटकर, डॉ. विश्वनाथ कराड, अभिनेते स्वानंद किरकिरे, डॉ. रघुनाथ माशेलकर, प्रा. राहुल कराड.

जनसंपर्क विभाग,
माईर्स एमआयटी, पुणे